Issue : XV, Vol. XII
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 4.22
ISSN 2229-4406
Sept. 2017 To Feb. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Gender Discrimination in Health<br>**Dr. M. M. Patel** | 1 |
| 2 | A Study of Symbolism in Girish Karnad's Play Tughlaq<br>**Anant J. Somuse** | 7 |
| 3 | Gender and Race in the Select Plays of George Bernard Shaw<br>**Dr. Shyam T. Jadhav** | 11 |
| 4 | Principles of India's Foreign Policy & Impact on World Politics<br>**Dattatray M. Waghule** | 16 |
| 5 | Characteristics of Population in Nanded District<br>**Renuka G. Tammalwar** | 22 |
| 6 | भारताचे कृषी.उत्पादन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचा कृती कार्यक्रम : विशेष संदर्भ मराठवाडयाचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ दिलीप एस. अर्जुने** | 27 |
| 7 | १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाचा आढावा<br>**डॉ. दयानंद व्ही. शिंदे** | 32 |
| 8 | महात्मा गांधी यांचे शिक्षणविषयक विचार<br>**शिवाजी उगले** | 37 |
| 9 | यशवंतराव चव्हाण जीवन आणि कार्य<br>**डॉ एल. बी. घुमरे** | 42 |
| 10 | बसवेश्वरकालीन धार्मीक व्यवस्था<br>**डॉ. रत्नाकर बाबूराव लक्षटे** | 46 |
| 11 | दलिता समोरील आव्हाने आणि उपाय<br>**डॉ. पी. एस. देशमुख** | 52 |



S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

IMPACT FACTOR 4.22

ISSN 2229-4406

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue - XV, Vol. XII**
**Year - VIII (Half Yearly)**
**Sept. 2017 To Feb. 2018**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
**Jyotichandra** Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Suhas Avhad**
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. D. Raja Reddy**
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**Dr. E. Siva Nagi Reddy**
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

**Dr. A. H. Jamadar**
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Yu Takamine**
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

**Dr. Shaikh Moinoddin G.**
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

**Scott A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. N. G. Mali**
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

**Dr. Babasaheb M. Gore**
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. V.J. Vilegave**
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

7

# १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाचा आढावा

*डॉ. दयानंद व्ही. शिंदे*
अर्थशास्त्र विभाग,
शंकरराव पाटील महाविद्यालय,
भूम, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र) भारत

**Research Paper - Economics**

**प्रस्ताविक**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाला आर्थिक विकासाचा आधार मानून औद्योगिकरणाला चालना दिली. देशातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी कल्याणकारी राज्याची स्थापना समाजवादी समाज रचना प्रस्थापित करण्यासाठी अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका मान्य केली. पंचवार्षिक नियोजनाच्या माध्यमातून कृषी, उद्योग व पायाभूत सुविधाचा विकास चालू असतांना सन १९९० च्या दशकात अर्थव्यवस्था आर्थिक पेचप्रसंगात सापडली. या काळात राजकोषीय तूट प्रचंड वाढली होती. विदेशी कर्जाचा भार खूपच वाढला होता. सार्वजनिक उपक्रमातील तोटा सतत वाढत होता अशा विविध कारणामुळे देश कर्जाच्या सापळ्यात सापडला होता. आंतरराष्ट्रीय व्यापाराची देय्यता फेडणे अशक्य झाले होते. परकीय चलनाचा साठा केवळ दोन आठवड्याचा व्यवहार भागवण्यापुरताच शिल्लक होता. तेव्हा भारतीय अर्थव्यवस्थेला कर्जसंकटातून काठावर आणण्यासाठी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंगराव व अर्थमंत्री मनमोहन सिंगने आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेकडून सशर्त कर्जसुविधा प्राप्त केली. अर्थव्यवस्थेत आर्थिक सुधारणा करण्यासाठी १९९१ मध्ये तात्काळ आर्थिक सुधारणा लागू करण्यासाठी नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. या नव्या आर्थिक धोरणाचे स्वरुप व तरतुदी स्पष्ट होण्यासाठी या धोरणाचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

**शोध निबंधाची उद्दिष्टे :-**

१) नवीन आर्थिक धोरणाची संकल्पना अभ्यासने

२) नवीन आर्थिक धोरणातील तरतुदीचा आढावा घेणे.

**शोध निबंधाचे गृहितके :-**

१) नविन आर्थिक धोरण पारंपारिक धोरणापेक्षा नवीन व मुक्त स्वरुपाचे आहे.

२) नवीन आर्थिक धोरणाच्या काळात अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका कमी होत आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा सामाजिक शास्त्राशी निगडीत असून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक स्वरुपाचा आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेण्यात्त आला आहे यात संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे वगैरेचा तथ्यसंकलनासाठी आधार घेण्यात आला.

**नवीन आर्थिक धोरणाचा आढावा :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत सन नव्वदच्या दशकात आर्थिक अरिष्ट उद्‌भवले होते. या काळात विदेशी कर्जाचे प्रमाण प्रचंड वाढले होते. राजकोषीय तूट जवळपास GDP च्या ७ टक्केवर पोहचली होती. विदेशी कर्जावरील व्याजाचा हप्ता फेडने झाले होते. भाववाढीचा आकडा दोनअंकी झाला होता. परकीय गंगाजळीचा साठा केवळ दोन आठवडे पुरेल इतकाच होता. परिणामी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार संकटात सापडला होता. तेव्हा आर्थिक व्यवहाराची विस्कटलेली घडी पूर्वपदावर आणण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसींगराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी परकीय चलन प्राप्तीसाठी नाणेनिधी व जागतिक बँकेकडे सोने तारणावर कर्ज घेतांना आर्थिक स्थिरीकरण आणि संरचनात्मक समायोजन कार्यक्रम सुरु करण्याच्या अटीवर कर्ज मिळवले. या आर्थिक सुधारणा कार्यक्रमातील तरतुदी लाच नवीन आर्थिक धोरण नाव दिले गेले आहे. या नव्या आर्थिक धोरणात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तत्वत्रयीचा अंतर्भाव आहे. या धोरणाला LPG या संक्षिप्त नावाने संबोधले जाते. त्यामुळे LPG धोरणाची स्वतंत्र आढावा घेणे महत्वाचे वाटते.

**अ) उदारीकरण :-**

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणातील उदारीकरण हे एक महत्वाचा "उदारीकरण म्हणजे" उत्पादन, आयात-निर्यात, गुंतवणूक यावरील अनावश्यक निर्बंध दूर करणे, परवाना पद्धती शिथिल करणे होय." व्ही.जे.बामोल यांच्या मते "उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रास उत्पादन, गुंतवणूक व वितरण याकरीता प्रवेश करण्यास व कोणत्याही उद्योगाना उत्पादनातून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य होय." उदारीकरणातून असे स्पष्ट होते की बंदिस्त अर्थव्यवस्थेचे मुक्त अर्थव्यवस्थेत

S.P. Mahavidyalaya, Bhoom Bhoom Tal. ... bad

रुपांतर केले जाते. उदारीकरणाच्या प्रक्रियेत नियंत्रीत व नियोजित व्यवस्थेऐवजी अर्थव्यवस्था खुली करण्यावर भर दिला जातो. सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करुन खाजगी उद्योजक व व्यावसायिकांना निर्णय स्वातंत्र्याची मुभा दिली जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात १९९१ नंतर उदारीकरणाच्या प्रक्रियेद्वारे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील साचेबंदपणा, नोकरशाही वृत्ती उद्योग व्यवसायावरील अनावश्यक बंधने शिथिल करुन खाजगी क्षेत्राला सरकारी परवाण्यापासून मोकळीक दिली गेली. अर्थव्यवस्थेतील सरकारची हस्तक्षेपी भूमिका कमी करण्यात आली. १९९१ नंतर सरकारने रुपयाचे अवमूल्यन केले. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे १८ उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवानामुक्त केले. मक्तेदारी व प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार कायदा रद्द केला गेला. फेरा कायद्याऐवजी फेमा कायदा लागू केला. रुपयाचे चालू खात्यावर परिवर्तनियता करण्यात आले.

**ब) खाजगीकरण :-**

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणातील खाजगीकरण हा एक महत्वाचा पैलू असून त्याची १९९१ नंतर अंमलबजावणी सुरु झाली. खाजगीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतल सार्वजनिक उद्योगाचे निर्गुंतवणूक करणे होय. बार्बरा ली व जॉन नेलीस यांच्या मते, "खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उपक्रमातील सरकारी भांडवल काढून घेऊन त्याची मालकी व व्यवस्थापनात खाजगी गुंतवणूकदारांना सहभागी करुन घेणे होय."

खाजगीकरणाच्या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्रातील सरकारचे भांडवल व सहभाग कमी करुन त्याच्या मालकीचे हस्तांतरण खाजगी व्यक्तीकडे केले जाते. देशी व विदेशी खाजगी गुंतवणूक दारांना अधिक वाव दिला जातो.

भारत १९९१ नंतर खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी सरकारने निर्गुंतवणूक मंत्रालयाची स्थापना करुन अटलबिहारी बाजपेयी सरकारच्या काळात श्री अरुण शौरी यांना या खात्याचे मंत्री केले. त्यांनी आपल्या कार्यकाळात बाल्को, भेल, गेल सारखे सरकारी उद्योग खाजगी मालकास विकून सरकारी भांडवल काढून घेतले आज देशात शिक्षणाचे सुध्दा खाजगीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. खाजगीकरणामुळे भारतीय मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलशाली व्यवस्था असून बाजारव्यवस्था प्रस्थापित केली जात आहे. नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर अराष्ट्रीयीकरण, संयुक्त उपक्रम उद्योगावर कामगाराची मालकी, इत्यादी पद्धती आवलंबण्यात आली आहे. याशिवाय करार तत्व, ठेवा पद्धती, स्वायत्तता व उत्तेजन पद्धतीचा अवलंब करुन खाजगीकरणाची प्रक्रिया पुढे रेटली जात आहे.

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

**क) जागतिकीकरण :-**

नवीन आर्थिक धोरणातील तिसरा व महत्वाचा टप्पा म्हणजे जागतिकीकरण होय. आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जागतिक बँक, नाणेनिधी व अमेरिका यांच्या दबावाखाली गॅटचे रुपांतर जागतिक व्यापार संघटनेत करुन १ जानेवारी १९९५ रोजी तीची स्थापना करण्यात आली. भारत WTO चा संस्थापक सदस्य असल्याने स्वाभाविकपणे जागतिकीकरणाची प्रक्रिया स्वीकारणे भारताचे कर्तव्य बनले. जागतिकीकरण म्हणजे, राष्ट्राच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे होय." जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत खुल्या व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी खुल्मा बाजारव्यवस्थेचा स्वीकार करणे अपेक्षित असते. भारताच्या संदर्भात १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणाच्या माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. WTO च्या तरतुदीचा भारतीय अर्थव्यवस्थेत आवलंब करण्यात आला आहे. WTO च्या अटी व नियमानुसार आंतरराष्ट्रीय व्यापाराला गतिमान करण्यासाठी व्यापारातील अडथळे दूर करण्यात आले आहे. श्रम, भांडवल व तंत्रज्ञानाच्या मुक्त गतिशीलतेला प्रोत्साहन देण्यात येत आहे. आयात शुल्क प्रशुल्केत्तर अडथळे कमी करुन आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यासाठी देशी बाजारपेठा मोकळ्या केला जात आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होण्यासाठी कृषी, सेवा, भांडवल व तंत्रज्ञानाच्या मुक्त हालचाली होण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने अनेक करार केले आहेत. त्यानुसार कृषीविषयक करारात, शेतीमालाच्या व्यापारातील अडसर, किंमत व विपणी आधार, अनुदाने, निर्यात अनुदाने टप्याटप्याने बंद करण्यात आले आहे. भेदभावाविरहीत बाजारपेठ उपलब्धता, घरगुती आधार कमी करणे, याशिवाय बौध्दिक संपदा हक्क करार (TRIPS) TRIMP वगैरे करार करण्यात आले आहेत. व्यापारविषयक बौध्दिक संपदा हक्क करारानुसार प्रत्येक सभासद राष्ट्राला पेटंट कायदा करण्याचे बंधन टाकले. TRIPS नूसार पैदासकारास वाणाचे उत्पादन विक्री, वितरण करण्याचा हक्क मिळाला.

**मुल्यमापन :-**

भारत सरकारने १९९१ साली स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाची आवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण अर्थात खाऊजा धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेत अंतर्भाव केल्याने स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाकरीता स्वीकारलेली मिश्र अर्थव्यवस्थेत मोडित काढण्यात येत आहे. समाजवादाला बगल देऊन विकसित देश अमेरिका, IMF व WB यांच्या दबावाला बळी पडून देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आणले जात आहे. बहुराष्ट्रीय

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

कंपण्याला बाजारपेठ खुली करुन दिली गेल्याने भारतात पुन्हा एकदा नववसाहतवाद स्थापन होत आहे. याशिवाय जागतिकीकरणाची प्रक्रिया स्वीकारण्यासाठी अर्थव्यवस्था भक्कम करणे अपेक्षित होते. मात्र हा निर्णय दबावाखाली घेण्यात आला आहे. त्यामुळे देशातील लघु व कुटीर उद्योगावर याचा विपरीत होत आहे. नवीन आर्थिक धोरणाच्या काळातील विकास हा रोजगारीशिवाय विकास असल्याने बेकारीच्या गंभीर परिणामाला सामोरे जावे लागत आहे. थोडक्यात नवीन आर्थिक धोरण अरिष्टाच्या पार्श्वभूमीवर स्वीकारले गेले मात्र देशाचा कर्जबाजारीपणा संपला का हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

## संदर्भ सूची :-

१) देसाई-भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, २००६.
२) देव-झामरे-भारतीय अर्थव्यवस्था, पिंपळापुरे ॲन्ड कं.पब्लिशर्स नागपूर, १९९८.
३) डॉ. जोत्स्ना देशपांडे - विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २०११
४) डॉ.जी.एन.झामरे - भारतीय अर्थव्यवस्था, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर २०११
५) रंजन कोळंबे - भारतीय अर्थव्यवस्था, भगिरथ प्रकाशन, पुणे २०१५.
६) डॉ. सुखदेव खंदारे-भारतीय अर्थव्यवस्था, एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद २०१३
७) डॉ. पद्माकर दुभाषी - जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Tq. Bhoom Dist O.bad

PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist. Osmanabad